पुण्यनगरी दि 23/09/23

# पाणीपुरी विक्रेत्याकडून २ गावठी कट्टे जप्त

## शिवाजीनगर पोलिसांची कारवाई

**नांदेड/प्रतिनिधी**

शिवाजीनगर पोलीस ठाण्याच्या गुन्हे शोध पथकाने एका पाणीपुरी विक्रेत्याला २ गावठी पिस्टल व ५ जीवंत काडतुसांसह जेरबंद केले. दि. २९ सप्टेंबर रोजी सकाळी ही कारवाई करण्यात आली.

गणेशोत्सवाच्या अनुषंगाने शिवाजीनगर पोलीस ठाण्याचे पोलीस निरीक्षक मोहन भोसले यांनी वरिष्ठांच्या आदेशाप्रमाणे शिवाजीनगर गुन्हे शोध पथकाला सतर्क राहण्याचे आदेश दिले होते. या पथकातील मिलिंद सोनकांबळे यांना दि.२२ सप्टेंबर रोजी शहरातील नवीन मोंढा भागात कृषी उत्पन्न बाजार समिती कार्यालयाच्या पाठीमागे गावठी कट्ट्याची विक्री होणार असल्याची माहिती मिळाली. पथकातील कर्मचाऱ्यांनी सापळा रचून पाणीपुरी विक्रेता संजय परिहार (२६, रा.बिल्हेटी ता.भोडेर जि.दतीया-मध्यप्रदेश, ह.मु.प्रफुल्लनगर, चिखलवाडी ता.भोकर जि. नांदेड) यास ताब्यात घेतले. त्याच्याकडून २ गावठी कट्टे व ५ जीवंत काडतुसे असा एकुण ३० हजार रूपयांचा ऐवज जप्त करण्यात आला. या प्रकरणी शिवाजीनगर पोलीस ठाण्यात ३१९/२३ नुसार ३/२५ आर्म ॲक्टप्रमाणे गुन्हा दाखल केला आहे.



पोलीस अधीक्षक श्रीकृष्ण कोकाटे, अपर पोलीस अधीक्षक अबिनाश कुमार, डॉ. खंडेराव धरणे तसेच उप विभागीय पोलीस अधिकारी सुरज गुरव, पोलीस निरीक्षक मोहन भोसले यांच्या मार्गदर्शनाखाली गुन्हे शोध पथकाचे प्रमुख फौजदार मिलींद सोनकांबळे, जमादार रविशंकर बामणे, पोकॉ देवसिंग सिंगल, शेख अझहर, लिंबाजी राठोड, विष्णु डफडे, दत्ता वडजे, गफार शेख तसेच चार्ली पथकातील आकाश सावंत, सय्यद मुजाहिद, प्रशांत गजभारे व सायबर सेलचे राजू सिटीकर, दीपक ओढणे यांनी ही कारवाई केली.